अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच
सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादीचे
पदाधिकारी यांचे परदेश दौरे...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/अकरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक :- ०६ एप्रिल, १९९६.

पहा:- १)शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकसंकीर्ण-१०८९/प्र.क्र.२२१/अर्थसंकल्प-१९, दिनांक १५ जानेवारी १९९०.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर १०९१/१८१/४/९१/११, दिनांक ०८ फेब्रुवारी,१९९१

३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर १०९४/प्र.८/९४/११, दिनांक ३० मार्च, १९९४.

४) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर १०९४/प्र.क्र. २६/९४/११, दिनांक २९ नोव्हेंबर, १९९४.

५) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्र टोआरएन १२९५/प्र.क्र.६/९५/दहा, दिनांक ७ ऑगस्ट, १९९५.

६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर १०९५/३७०/प्र.क्र.१०/९५/११, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९५.

**शासन परिपत्रक :-**

अखिल भारतीय सेवेतील व राज्य सेवेतील अधिकारी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादीचे पदाधिकारी यांच्या परदेश दौऱ्यांच्या संदर्भातील बरेच प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर केले जातात. हे परदेश दौरे प्रामुख्याने प्रशिक्षण, परदेशात आयोजित केलेली चर्चासत्रे, किंवा त्या त्या विभागाच्या कामकाजाशी संबंधित असतात. परदेश दौऱ्यांबाबत केंद्र शासनाने निर्गमित केलेले आदेश व मार्गदर्शक सूचना, यापूर्वी सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आल्या आहेत. तसेच या दौऱ्याचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवितांना काय काळजी घ्यावी याबाबत आदेश/सूचना राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केले आहेत. या सर्व आदेशांचे काटेकोरपणे अनुपालन करावे अशी सूचनाही सर्व मंत्रालयीन विभागांना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. परंतु या आदेशांचे अनुपालन काटेकोरपणे व योग्य रीतीने होत नाही असे निदर्शनास आले आहे. तसेच अलीकडे अशा परदेश दौऱ्यांच्या प्रस्तावात बरीच वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषगाने शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, अपवादात्मक असेल अशा प्रकरणांखेरीज इतर प्रकरणात परदेश दौरे करण्याबाबत शासकीय अधिकारी, मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांना परावृत्त करण्यात यावे. त्याचप्रमाणे अशा परेदश दौऱ्यांची आवश्यकता आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक शिफारस समिती नेमावी असा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. शासनाच्या वरील निर्णयानुसार शासकीय अधिकारी/मंडळे, महामंडळे यांचे पदाधिकारी यांच्या परदेश दौऱ्यांच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांची शिफारस समिती नेमण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २) | अपर मुख्य सचिव (गृह) | सदस्य |
| ३) | अपर मुख्य सचिव (नियोजन) | सदस्य |

३. मंत्रालयीन विभागांनी पाठविलेल्या परदेश दौऱ्यांच्या प्रस्तावाची छाननीवरील समिती करील व सदर परदेश दौऱ्याची आवश्यकता आहे किंवा कसे याची तपासणी करून आपली शिफारस शासनाच्या मान्यतेसाठी सादर करील.

क्र.मा.प...

४. मंत्रालयीन विभागांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या, मंडळे, महामंडळे यांच्या पदाधिकाऱ्यांच्या दौऱ्याचे प्रस्तावांची योग्य छाननी करुन, शिफारस समितीकडे पाठविताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी :--

(१) परदेश दौऱ्यांचे प्रस्ताव सध्याच्या प्रथेप्रमाणे केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभाग (सेवा उपविभाग) व वित्त विभाग यांच्या सहमतीने मुख्य सचिवांना सादर करावे.

(२) वर स्पष्ट केल्याप्रमाणे प्रस्तावाची मूळ नस्ती मुख्य सचिवांकडे सादर करतांना प्रस्तावाची माहिती देणारी स्वयंस्पष्ट टिप्पणी (सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रासह) सहा प्रतीत समिती सदस्यांच्या अवलोकनासाठी सादर करावी.

(३) शिफारस समितीचे निष्कर्ष संबंधित मंत्रालयीन विभागाच्या प्रभारी मंत्र्यांमार्फत मा. मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात येतील. त्या शिफारशींना शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच सदर परदेश दौऱ्यांना केंद्र शासनाची मान्यता मिळविण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. सी. श्रीवास्तव,
प्रधान सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
मुख्य सचिवांच्या कार्यालयातील उप सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग/ का. ८,१०,१२-अ, १९,२०, २८-अ,३४
गृह विभाग/पोल १,
महसूल व वन विभाग/फ-७,
सर्व मंत्रालयीन विभाग (अधिक ५ प्रतींसह),
सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती आहे की, त्यांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व सांविधिक संस्था, शासकीय तसेच निमशासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे व महामंडळे यांच्या निदर्शनास आणून त्यांचे कटाक्षाने पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.
स्वयंस्पष्ट टिप्पणीच्या दोन प्रती सामान्य प्रशासन विभाग/११ कडे पाठवाव्यात.

* पत्राने

# तपासणी सूची

## विदेशात प्रशिक्षण/दौऱ्याच्या प्रस्तावाची छाननी करताना तपासावयाचे मुद्दे

१. दौऱ्यावर जाणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व विभाग.

२. विदेश दौऱ्याचे ठिकाण व दौऱ्याचा कालावधी

३. *(अ) विदेश दौऱ्यासंबंधीचे/प्रशिक्षणासंबंधीचे आमंत्रण सरळ राज्य शासनाकडे आले आहे काय ?

*(ब) राज्य शासनाकडे सरळ आमंत्रण आले असल्यास, विभागाच्या/संस्थेच्या नावाने आले आहे की व्यक्तीच्या नावाने आले आहे ?

४. (अ) विदेश दौऱ्याचे/प्रशिक्षणाचे आमंत्रण केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाकडून आले आहे काय ? विदेश दौऱ्यासंबंधीच्या/प्रशिक्षणासंबंधीच्या विषयाशी संबंधित केंद्र शासनाच्या मंत्रालयाचे नाव काय ?

(ब) केंद्र शासनाने राज्य शासनाकडून अधिकाऱ्यांच्या नावाची शिफारस मागितली आहे की विशिष्ट अधिकाऱ्यांची शिफारस केली आहे ?

५. (अ) विदेशी दौऱ्याचा प्रस्ताव स्वतःहून संबंधित मंत्रालयीन विभागाने शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला आहे काय ?

(ब) असल्यास दौऱ्याचे प्रयोजन, महत्त्व व उपयोगिता याबाबत सविस्तर विवेचन केले आहे काय?

६. विदेशी प्रशिक्षण/दौरा संबंधित अधिकारी हाताळत असलेल्या विषयाशी संबंधित/उपयुक्त आहे किंवा काय ? विदेश दौऱ्याच्या/प्रशिक्षणाच्या विषयाशी उपयुक्त अशी <u>शैक्षणिक अर्हता</u> संबंधित अधिकाऱ्यांकडे आहे किंवा काय ?

७. ज्या अधिकाऱ्यांची विदेश दौऱ्यासाठी/प्रशिक्षणासाठी शिफारस करण्यात येते त्यांचा जन्मदिनांक, सेवानिवृत्तीचा दिनांक आणि सध्याच्या पदावर किती सेवा झाली आहे व या पदावर पुढे किती काळ ते राहणार आहेत ? विदेशी प्रशिक्षणासाठी/दौऱ्यासाठी किमान सेवेची अट असल्यास ती पूर्ण होते किंवा कसे.

८. विदेश दौऱ्यासाठी/प्रशिक्षणासाठी वयाची मर्यादा आहे किंवा काय ? असल्यास, संबंधित अधिकारी वयोमर्यादा पूर्ण करतात किंवा काय ?

९. (अ) विदेश दौऱ्याचा/प्रशिक्षणाचा एकूण खर्च किती ?

(ब) सदर खर्च कोण करणार आहे ?

(क) सदर खर्च विदेशी संस्था करणार असेल तर संस्थेचा तपशील

(ड) राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील मंडळ/महामंडळ खर्च करणार असल्यास त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद आहे का ?

(ई) या खर्चाबाबत सक्षम प्राधिकारी कोण आहेत व त्यांनी खर्चास मंजुरी दिली आहे काय ?

(कृ.मा.प...

१०. विदेश दौऱ्यावर/प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण चालू आहे किंवा काय ?

११. विदेश दौऱ्यावर/प्रशिक्षणासाठी प्रस्तावित अधिकाऱ्यांनी गेल्या ५ वर्षात केलेल्या विदेश दौऱ्याचा/घेतलेल्या विदेशी प्रशिक्षणाचा तपशील व कालावधी

१२. या अधिकाऱ्यांचा प्रस्ताव मान्य न झाल्यास पर्यायी कोणते अधिकारी विदेश दौऱ्यासाठी/प्रशिक्षणासाठी पाठविता येतील ?

---

* टीप :- या मुद्दयांच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.टीआरएन-११९५/ प्र.क्र.६/९५/दहा, दिनांक २०.०१.१९९५ च्या सूचनांचा विचार करणे अत्यावश्यक आहे.